## ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ११/०८/२००९

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक ५, दिनांक ११/०८/२००९**

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती-----------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक २०/०८/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या ' **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ५, दिनांक ११.०८.२००९** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे ही विनंती.
**मा.महापौर महोदया यांचे मंजूरीने .. .. ..**

**(सौ. छाया प्र. मानकर )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**सभा सूचना क्रमांक ५, दिनांक ११.०८.२००९ ची विषयपत्रिका.**

**प्रश्नोत्तरे.**
**( टिप:- दिनांक १८.०७.२००९ रोजच्या मा.सर्वसाधारण सभेतील मा.सदस्यांचे विनंतीनुसार राखून ठेवण्यांत आलेल्या प्रलंबित प्रश्नोत्तरांसाठी प्रथम प्राधान्य देण्यांत येईल .)**

| प्रकरण क्रमांक | विषय |
|---|---|
| ६५. | ठाणे महानगरपालिकेच्या दि. २०.०६.२००९ व दि. २३.०६.२००९ रोजीच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत. |
| ६६. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील " सहाय्यक आयुक्त " ही पदे "प्रभाग अधिकारी " या संवर्गातून पदोन्नतीने भरणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत. |
| ६७. | ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर उप स्थानक अधिकारी (क्वॉलिफाईड) या संवर्गात निवड समितीने निवड केलेल्या उमेदवारांना नियुक्ती मिळणेबाबत. |

६८. मंजूर विकास आराखडयानुसार रहिवास क्षेत्रातून निर्माण होणारा **TDR** वाणिज्य वापराकरीता अनुज्ञेय करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदलाचे प्रकरण शासनाचे अंतिम मंजुरीकरीता पाठविणेबाबत.

६९. कौसा येथील रुग्णालयासाठी आरक्षित भूखंडावर लोक सहभागातुन अथवा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर रुग्णालय विकसित करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७०. ठाणे महानगरपालिकेच्या राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयासाठी महापालिकेची स्वतंत्र ट्रस्ट स्थापन करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७१. इडनवुड कॉम्प्लेक्स चि. मानपाडा येथील प्रस्तावित प्रसुतीगृह लोक सहभागातुन चालविण्यास मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७२. ठाणे शहराच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत अल्प उत्पन्न घटकांसाठी ४० चौ.मी. इतक्या चटई क्षेत्राच्या २०% सदनिका बांधणे अनिवार्य करणेची तरतूद सामविष्ट करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७३. विकास आराखडयानुसार आरक्षित असलेल्या सुविधा भूखंडावर बांधण्यात येणा-या वेल्फेअर सेंटर/समाजमंदिर जेष्ठ नागरिक संघाना उपलब्ध करुन देणेबाबत मा.सर्वसाधारण सभा प्रकरण क्र.१९३ दिनांक १७/०९/२००८ फेरविचारार्थ मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर. (दिनांक १६/०२/२००९ रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण क्रमांक ३१०)

७४. महाराष्ट्र प्रादेशिक व नगरचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये सर्व्हे क्र.२६९/अ अे, २६९/१ बी व इतर मौजे माजिवडे पोखरण उपवन तलावाजवळ रस्त्याचे आखणीत बदल करणेबाबत.

७५. विकास नियंत्रण नियमावलीतील पार्किंगचे नियमांत फेरबदल करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७६. मंजूर सुधारित विकास योजना ठाणे, से.क्र.५, मौजे माजिवडे येथील स.क्र.१०७पै, १०८पै, १०९पै, ३९१ पै व ३४४ पै या जमिनीवरील ट्रक टर्मिनस आरक्षणाचे भूसंपादन करणेबाबत.

७७. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय पुनरुत्थान अभियानातर्गंत (JNNURM) ठाणे महानगरपालिकेमार्फत परिवहन सेवेसाठी दाखल करण्यात आलेल्या सविस्तर प्रकल्प अहवाल (T.D.R.) मधील तरतूदीनुसार ठाणे शहरातील वाहन पार्किंग धोरण (व्यावसायिक व निवासी मालमत्ता), जाहिरात धोरण, बेटरमेंट लेव्ही,ट्रान्झिट ओरिएंटेड डेव्हलपमेंट आणि परिवहन सेवेस निधी उपलब्ध करणेसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.

७८. हिंदू स्मशानभूमी व लिंगायत समाजाकरीता रुद्रभूमीसाठी जागा उपलब्ध करुन देणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

७९. जीवनरक्षक औषधांवरील जकात माफी रद्द करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

८०. प्र.क्र.५० मधील पारसिक सायली ते जुना मुंबई पुणे रस्त्यापर्यंत जोड रस्त्याचे डांबरीकरण/नुतनीकरण करणे व गटार बांधणेस येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

८१. ठाणे महाविद्यालय ते नविन कळवा ब्रिजपर्यंत म्युझिकल जॉगिंग ट्रॅक तयार करणेस येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

८२. सन्मा.सदस्य श्री. बळीराम नईबागकर यांचे नगरसेवक पदाचे अनर्हतेबाबत.

८३. ठाणे महानगरपालिका ॲथलेटिक्स प्रशिक्षण योजना प्रशिक्षण योजना प्रशिक्षकांचे मानधन वाढविण्यास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. (दिनांक २०/०६/२००९ रोजीच्या सभेतील तहकूब प्रकरण क्रमांक १५)

८४. सन २००९-१० या शैक्षणिक वर्षी मुंब्रा येथे प्राथमिक शाळा क्र.७५ येथे मराठी माध्यमाची नवीन माध्यमिक शाळा सुरु करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

८५. सन २००९-१० या शैक्षणिक वर्षी येऊर येथे प्राथमिक शाळा क्र.६५ येथे मराठी माध्यमाची नवीन माध्यमिक शाळा सुरु करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

८६. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद ठाणे यांचे वेतन पथक कार्यालयासाठी ठाणे महानगरपालिका शाळा क्र.०७ मधील तळ मजल्यावरील हॉल भाडे तत्वावर उपलब्ध करुन देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

८७. यशवंत रामा साळवी तरणतलाव येथील व्यायामशाळा भाडे तत्वावर देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

**(सौ. छाया प्र. मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- ११.०८.२००९